डॉन आणि डॉनाने केलेली फलंदाजी




लेखनः एल पार्किन्स

चित्रः बी. टोबी

मराठी: अश्विनी बर्वे





DON
THE FARM
THE SCHOOL
TO THE BASEBALL FIELD
THE POND
POST OFFICE & STORE
THE CHURCH
THE TWINS LIVE IN THIS HOUSE
DONNA

डॉन आणि डॉनाने केली फलंदाजी



लेखनः एल पार्किन्स

चित्रः बी. टोबी

मराठी: अश्विनी बर्वे

डेनिस, डगलस आणि डेरिकला



डॉन आणि डॉना जुळे होते.

डॉन मुलगा होता.

डॉना मुलगी

दोघांची उंची सारखी होती.

त्यांचे आवाज अगदी सारखे होते.

दोघांचे डोळे निळे, केस लाल आणि. .

दोघांच्या चेहऱ्यावर वांग पण सारखेच आहेत.


पूर्ण २३!

डॉन मुलांचे कपड़े घालत असे.

आणि त्याचे केस छोटे होते.

डॉना मुलींचे कपडे घालत असे आणि तिचे केस लांब होते. बस एवढाच फरक दोघांमध्ये करू शकतो.





डॉनला बेसबाल आवडत असे.

तो रोज घराबाहेर जाई आणि आपला चेंडू भिंतीवर मारत असे.



तो असे नाटक करे की जसे की तो
असा फलंदाज आहे की ज्याने चेंडूला
जबरदस्त टोलवले आहे. मग तो पळत
जाई आणि घसरत सीमेवर पोहचे.



डॉनच्या वाढदिवसाला त्याच्या जुळ्या
बहिणीने त्याला एक छान भेट दिली. तिने
डॉनला बेसबॉलचा असली पोशाख दिला.
एक चेंडू, एक बॅट, हातमोजे आणि एक
टोपी दिली.

डॉन खूप खुश झाला, एवढा खुश की
रोज रात्री झोपतांना तो आपली
भेटवस्तू जवळ घेऊन झोपत असे.





तो नेहमी स्वप्नं बघे की तो एका
बेसबॉल टीमबरोबर खेळत आहे.

इतर दुसऱ्या मुलींसारखे डॉनाला बेसबॉल खेळता येत नव्हते. म्हणून डॉनने तिला खेळायला शिकवले.





डॉना लवकरच आपल्या भावासारखी उत्साहाने पळू लागली.





डॉनने तिला मुलांसारखी
गोलंदाजी करायला शिकवली.



त्याने शिकवले की
सीमेपर्यंत कसे पोहचायचे.



त्याने डॉनाला चेंडू कसा
अडवायचा हे शिकवले
आणि खेळपट्टीवर कसे
उभे राहायचे हे ही

पण डॉनाला फलंदाजी आवडत नसे,
जेव्हा तिचा भाऊ चेंडू तिच्याकडे फेके ....



...तिला खूप भीती वाटत असे आणि
तिच्या पायांचे कापरे होत असे.

ती आपले डोळे गच्च मिटून घेई आणि
मग बॅट चेंडूला मारण्यासाठी फिरवत असे

आणि मग सामान्य चूक होई.

पण तिला डॉनसाठी गोलंदाजी
करायला आवडत असे आणि चेंडू
पकडणे आणि त्याच्यामागे धावणे पण






ख़ासकर जेव्हा चेंडू
तिच्या डोक्याच्या
वर जात असे तेव्हा

hit it far over her head.

पण थोड्या वेळाने डॉनाबरोबर फलंदाजी करण्याचा डॉनला कंटाळा येऊ लागला. त्याला मुलांबरोबर खेळायचे होते. ते ही एका खऱ्याखुऱ्या संघात,एक खरा खेळ त्याला खेळायचा होता.





म्हणून एक दिवस तो आपल्या सायकलवर बसला आणि खेळाच्या मैदानाकडे निघाला.

तो डॉनाला घरी एकटीला सोडून गेला, तुझं तू बघ काय ते!





जेव्हा तो घरी आला तेव्हा तो खूप खुश आणि उत्साहात होता.


डॉनाने विचारलं:

“मुलांनी तुला त्यांच्याबरोबर खेळू दिलं का?”

“हो तर! खेळू दिलं,” डॉन म्हणाला. आणि त्यांनी मला संघाचा कर्णधार सुद्‌धा केलं. आमच्या संघाचे नाव ‘ऑल स्टार्स’ म्हणून ओळखली जाते. मी रोज त्यांच्याबरोबर खेळायला जाणार आहे.”



आता डॉन रोज आपल्या संघासोबत सराव करण्यासाठी जाऊ लागला. त्यानंतर एके दिवशी दुसऱ्या भागातला संघ आला.



‘‘आम्ही रेड़स् आहोत,’’ ते म्हणाले. “आम्हाला तुमच्या संघाच्या विरुद्ध खेळायची इच्छा आहे. मिस्टर वॉल्टर स्मिथ जिंकणाऱ्या संघाला एक मोठा चांदींचा कप इनाम म्हणून देतील.”





पण जया सकाळी हा महत्वाचा सामना होणार होता त्यादिवशी डॉनला भयानक सर्दी-खोकला झाला. डॉक्टर आले आणि म्हणाले, “आज अजिबात बेसबॉल खेळणार नाही.”

“तू अंथरुणावर पडून रहा.”



डॉनला खूप वाईट वाटले.

डॉनाला पण



''तू माझी सायकल घेऊन, माझे सगळे खेळायचे सामान घेऊन मैदानात जा,"

डॉनने डॉनाला म्हटले. "कदाचित दुसऱ्या मुलांना त्याचा उपयोग होईल."



म्हणून डॉनाने सर्व सामान बाहेर काढले आणि सायकलच्या छोट्याशा टोपलीत ठेवण्याचा प्रयत्न केला. पण टोपली खूप छोटी होती. सगळं खाली पडत होतं.



तेव्हा डॉनाच्या मनात एक विचार आला. तिने डॉनचे कपडे आपल्या कपड्यांवर घातले.

डॉनची बेसबॉल टोपी आपल्या डोक्यावर घातली. अशा पद्धतीने ती सगळं काही घेऊन जाऊ शकणार होती.



आता ती एकदम डॉन सारखी दिसत होती.

डॉन जसा दिसतो त्याच्यापेक्षाही अधिक ती डॉन सारखी दिसत होती पण तिला हे माहीत नव्हते.



इकडे मैदानावर बेसबॉलचा सामना सुरु झाला होता. “अरे डॉन कुठे आहे?” सगळेजण विचारू लागले.

“तो इथे हजर का नाही?”





जेव्हा डॉना खेळाच्या मैदानावर पोहचली. तेव्हा सगळ्यांना वाटले डॉन आला आहे. त्यांना आनंद झाला आणि त्यांनी टाळ्या वाजवल्या. डॉनाला काही सांगण्यासाठी वेळच मिळाला नाही.



‘‘डॉन तू उशिरा आला आहे!” पंच रागावले.


“तिथे जा आपल्या संघाजवळ आणि फलंदाजी कर!”!

डॉना खेळपट्टीवर गेली, ती खूप घाबरली होती. तिने आपले डोळे जोरात बंद केले आणि चेंडू आणि बॅट अशी फिरवली. पण तिची बॅट चेंडूला काही लागली नाही.




तीनवेळा तिने चेंडू मारण्याचा प्रयत्न केला पण ती यशस्वी झाली नाही आणि मग ती फलंदाजीतून बाहेर झाली.

पण यामुळे काही फारसा फरक पडला नाही. कारण ऑल-स्टार्सचा संघ आधीच पुढे होता. त्यांची गुणसंख्या २ आणि रेड्सची



खेळ पुढे गेला, पण तोपर्यंत काहीतरी झाले.

रेडस्चे दोन खेळाडू सीमेवर गेले.



त्यानंतर त्यांच्या एका
खेळाडून चेंडू हवेत उंच
मारला.

चेंडू आकाशात वर, खूप उंच गेला.




डॉना तो पकडायला धावली...




. . . पण सूर्याचा प्रकाश
तिच्या डोळ्यावर पडला.

तिला चेंडू
दिसला नाही.

चेंडू पकडण्याच्या ऐवजी
डॉनाने चेंडू जमिनीवर पडू दिला.




डॉनाच्या चुकीमुळे
रेडस ने तीन धावा केल्या.



डॉनाच्या चुकीमुळे रेड्स
आता एका धावेने पुढे होते.



खेळ संपायला काहीच मिनिटे बाकी होती. तो शेवटचा डाव होता. ऑल-स्टार्स साठी शेवटची संधी. ऑल स्टार्सचा पहिला फलंदाज काही करू शकला नाही.गर्दीने नापसंतीचा आवाज उठवला.



दूसरा ऑल-स्टार्सचा फलंदाजपण अयशस्वी झाला. गर्दीने अजूनच आरडाओरडा केला.



तेव्हा तिसऱ्या ऑल-स्टार्सच्या फलंदाजाने चेंडू मारला आणि तो धावला.



ऑल-स्टार्स आता जिंकू पण शकत होते जर पुढच्या फलंदाजाने चेंडू चांगला मारला तर

पण पुढचा फलंदाज डॉना होती!

आता तर तिला जास्तच भीती वाटू लागली होती. तिला माहीत होते चेंडू मारणे तिच्याच्याने होणारे नाही. तिला माहीत होते आता ऑल स्टार्स हरतील. तसेही तिने सांगितले नव्हते ती मुलगी आहे हे. तरीही ती धावपट्टीवर उभी राहिली.



गोलंदाजाने चेंडू फेकला, तो सरळ डॉनाच्या डोक्याकडे आला, डॉना वाकली आणि तिने डोळे बंद केले आणि बॅट फिरवली.



बॅट कशीकाय चेंडूला लागली माहीत नाही,कदाचित चेंडूच बॅटवर येऊन पडला असेल आणि चेंडू वर उडाला.

‘‘पळ डॉन, पळ!’’ गर्दी ओरडली.

‘‘डॉन?’’ डॉनाने विचार केला.


‘‘ओह! ते मला म्हणत आहेत” ती पळाली. ती याआधी कधीच एवढ्या वेगात धावली नसेल तेवढ्या वेगाने ती धावली.



ती आधी पहिल्या बेसकडे धावली आणि बाकी खेळाडू दुसऱ्या बेसकडे धावले.

धावा! गर्दीने आवाज दिला.





डॉना सगळे बेस पार करत गेली.


बाकी दोन्ही ऑल-स्टार्स खेळाडू मुख्य धावपट्टीवर पोहचले. आता गुणसंख्या बरोबर झाली होती. दोन्ही संघ आता ३-३ वर होते.



पण डॉना तिथं पोहचू शकणार होती का?

रेडसच्या क्षेत्ररक्षकाने चेंडू उचलला होता. तो मुख्य धावपट्टीवर मारणारच होता, त्याच्या आता डॉनाला तिथं पोहचायचे होते.

“घसर!” सगळे ओरडले.






“सुरक्षित!” पंचाने निर्णय दिला.

“हुर्रे!” दर्शक ओरडले.

डॉनाने ऑल-स्टार्ससाठी जिंकणारी धाव घेतली होती.

डॉना घसरली - त्याच पद्धतीने जसे तिला तिच्या भावाने शिकवले होते.



संघाचे खेळाडू डॉनाच्या भोवती जमा झाले होते. ते हसत होते, उत्साहात होते, ओरडत होते.



पण डॉना हसत नव्हती. तिला भीती वाटत होती की तिची टोपी कोणी काढली तर आणि सगळ्यांना कळले तर, की ती मुलगी आहे.

तिने आपले हात आणि गुडघे खाली टेकवले आणि हळूच रांगत ती खेळाडूंच्या बाहेर पडली.



ती कसेतरी करून डॉनच्या सायकलवर बसली आणि घराकडे निघाली.



पण गर्दीने तिला जातांना बघितले.

“बघा! डॉन जात आहे.” गर्दी ओरडली, ते सगळे डॉनच्या मागे धावले.

जशी ती घरी पोहचली ती सरळ तळघरात जाऊन लपली.



खेळाडूंनी तिचा पाठलाग करत सरळ तिचे घर गाठले आणि ते घरात घुसले. “आम्हाला डॉन पाहिजे.” ते जोरात म्हणाले.



‘‘मी इथं वर आहे,”’ डॉन म्हणाला.

डॉन त्यांना अंथरुणावर झोपलेला दिसला. त्यांनी विचार केला की तो खेळून दमला असेल.

नलसाज़ मिस्टर वॉल्टर स्मिथ यांनी

डॉनला तो सुंदर रुपेरी कप दिला.

डॉनला वाटत होते की त्यांनी असाच विचार करावा की त्याने खेळ जिंकला आहे. पण त्याने सत्य सांगितले.


“मी दिवसभर तर खेळात नव्हतो.” तो म्हणाला.

“ती नक्कीच डॉना असेल. जिने खेळ जिंकला असेल.”

‘‘ती कुठे आहे?”



आता सगळे डॉनाला शोधू लागले.
त्यांनी तिला पलंगाखाली शोधले.



दरवाज्याच्या मागे



पडद्याच्या मागे शोधले.





शेवटी त्यांना डॉना सापडली... ती
तळघरात कपाटात लपली होती.

त्यांनी डॉनाला बाहेर काढले आणि
नलसाज़ मिस्टर वॉल्टर स्मिथ यांनी तिला
तो मोठासा सुंदर असा रुपेरी कप दिला.



पण एवढेच नाही झाले तर ऑल स्टार्सने डॉनाला त्यांच्या संघाचा मॅनेजर केले.



आता तिला फलंदाजी करावी लागली नव्हती. पण ती प्रत्येक सामन्याच्यावेळी जात असे. तिच्यावर काही जबाबदाऱ्या होत्या.

ती सगळ्या गोष्टींची देखभाल करत असे. . .

बेसबॉलच्या सगळ्या बॅटीची...




बेसबॉलच्या सर्व चेंडूंची . . .





. . . आणि सर्व बेसबॉलच्या हातमोज्यांची . . .


. . . चेंडू पकडणाऱ्या
मुखवट्याची.




. . . आणि
पाण्याच्या
बादलीची पण.



डॉना सर्व खेळांची गुणसंख्या लिहिते.




ऑल-स्टार्स आता मोठे मोठे सुंदर कप जिंकत आहेत.



यावर्षी त्यांनी पूर्ण २३ कप जिंकले. ही तीच संख्या आहे जी डॉन आणि डॉनाच्या चेहऱ्यावरच्या वांगाच्या डागाची आहे.


TO
BASEBALL
FIELD


DON
THIRD
BASEMA
THIRD
BASE
PITCHER
BATTER
PITCHER'S
MOUND
UMPIRE
CATCHER
HOME
PLATE
THE
BASEBALL FIELD
LEFT FIELDER
CENTER FIELDER
SHORTSTOP
SECOND
BASE
RIGHT
FIELDER
SECOND BASEMAN
FIRST BASEMAN
FIRST
BASE
DONNA